# <u>राज्य धरण सुरक्षितता संघटनेचे कार्यविवरण</u>

धरण सुरक्षा कायदा-2021 दि.30/12/2021 पासून संपूर्ण देशभरात लागू करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या राजपत्राद्वारे दि.22/06/2022 रोजीच्या राज्य धरण सुरक्षितता संघटना अधिसूचित करण्यात आली आहे.

धरण सुरक्षा कायद्यानुसार निर्दिष्ट धरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे.

धरण सुरक्षा कायदा- 2021 अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या धरणांचे निकष पुढीलप्रमाणे आहेत.

**"**निर्दिष्ट धरण**"** म्हणजे पुढील निकषांची पूर्तता करणारे या कायदा लागू होण्यापुर्वी किंवा त्यानंतर (दि.30/12/2021) बांधलेले धरण होय.

*a) Height > 15 metres or*

*b) 10 metres < Height < 15 metres*

*Satisfying at least one of the following Criteria,*

*1) Crest Length ≥ 500* metres; or

*2)* Reservoir Capacity ≥ 1 MCM (*$Mm^3$); or*

*3) Max. Flood Discharge ≥ 2000 Cumecs ($m^3/s$); or*

*4) Dams having especially difficult foundation problems; or*

*5) Dam of unusual design*

1. राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरणामार्फत प्रसिद्ध मार्गदर्शक सुचना व प्रमाणके यांची धरण सुरक्षा कायदा-2021 च्या अनुषंगाने राज्यात अंमलबजावणी करणे.
2. धरणांना असलेल्या धोक्यांवर आधारित राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरणाच्या नियमानुसार धरणांचे वर्गीकरण करणे.
3. अ. जलसंपदा विभागाच्या मालकीच्या एकूण 2160 निर्दिष्ट धरणांचे पर्जन्यपूर्व व पर्जन्योत्तर तपासणी अहवालांची छाननी करणे.

   ब. मृद व जलसंधारण विभागाच्या मालकीच्या एकूण 455 निर्दिष्ट धरणांचे पर्जन्यपूर्व व पर्जन्योत्तर तपासणी अहवालांची छाननी करणे.

   क. जलसंपदा व मृद व जलसंधारण विभाग वगळून इतर जसे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,महाराष्ट्र राज्य जलविद्युत निर्मिती मर्यादित., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,महानगरपालिका, नगरपरिषद,शिक्षण संस्था व खाजगी कंपन्या इ. 56 निर्दिष्ट धरणांचे पर्जन्यपूर्व व पर्जन्योत्तर तपासणी अहवालांची छाननी करणे
4. अहवालांच्या छाननीत आढळलेल्या त्रुटींचे वर्गीकरण करणे.
5. 2671 निर्दिष्ट धरणांबाबत तपासणी व अनुषंगिक माहिती विदागार (Log Book) अद्यावत ठेवणे.
6. धरणांबाबत धरण सुरक्षेसंबंधी दुर्घटनेच्या (Dam Failure) अनुषंगाने राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरणास अहवाल सादर करणे.
7. धरणांबाबत धरण सुरक्षा बाधित करणारे विशेष प्रसंगाच्या (Dam Incidient) अनुषंगाने राष्ट्रीय धरण

सुरक्षा प्राधिकरणास अहवाल सादर करणे.

8. धरण सुरक्षा कायद्याच्या अनुषंगाने धरण सुरक्षेसंबंधी उपाय योजना सुचविणे.
9. धोकादायक धरणांच्या संचालनाबाबत मार्गदर्शक निर्णय घेणे.
10. जलाशयाच्या प्रथम घळभरणीच्या अनुषंगाने सुरक्षितता प्रमाणपत्र देणे.
11. निर्दिष्ट धरणांबाबत उपकरणांचा आधार सामग्री संकलन, प्रक्रिया व जतन करणेबाबत कायद्यानुसार अपेक्षित कार्यवाही करणे.
12. निर्दिष्ट धरणांबाबत जल हवामान विषयक उपकरणांचा आधार सामग्री संकलन, प्रक्रिया व जतन करणेबाबत कायद्यानुसार अपेक्षित कार्यवाही करणे.
13. निर्दिष्ट धरणांवरील भुकंप विषयक उपकरणांचा आधार सामग्री संकलन, प्रक्रिया व जतन करणेबाबत कायद्यानुसार अपेक्षित कार्यवाही करणे.
14. धरण सुरक्षा कायदा 2021, कलम 45 (1) अनुसार "वार्षिक अहवाल" प्रतिवर्षी जुन पर्यंत राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरण व राज्य शासनास, मा. लोकसभा, मा. राज्यसभा, मा. विधानसभा व मा. विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर मांडणेस्तव सादर करणे.
15. जलसंपदा विभागाच्या मालकीच्या कालव्यांचे तपासणी अहवालांची छाननी करणे.
16. मंजुर वार्षिक तपासणी कार्यक्रमाच्या अनुषंगाने निवडक कालव्यांची पाहणी करणे.
17. राज्यातील कालव्यांच्या स्थितीच्या अनुषंगाने वार्षिक कालवा वितरण प्रणाली सद्यस्थिती अहवाल प्रसिध्द करणे.